# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.04.2026** **वार: शुक्रवार**

1. महिला आरक्षण विधेयकावर चर्चेसाठी संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात; धोरण निर्मितीमध्ये महिलांना योग्य प्रतिनिधित्व देणं ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. महिला आरक्षण विधेयकाला मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडायला विरोधी पक्षांचा विरोध
3. राज्य विधान परिषदेच्या 9 जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर; 12 मे रोजी मतदान
4. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत वर्ध्याच्या हिंदी विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा आणि
5. सेवाभावनेने कार्य करणाऱ्या धर्मादाय संस्थांना शासनाचं कायम सहकार्य असेल; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**महिला-आरक्षण**

महिला आरक्षण विषयक विधेयकावरील चर्चेसाठी संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसांच्या विशेष सत्राला काल सुरुवात झाली. सभागृहाचं कामकाज सुरु होताना दिवंगत गायिका आशा भोसले यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आणि त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'केंद्रशासित प्रदेश' सुधारणा विधेयक 2026 प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विधी आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधानाची 131वं दुरुस्ती विधेयक तसंच, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक लोकसभेत सादर केलं. महिलांसाठी एक तृतीयांश आरक्षण निश्चित करताना 2011च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेतल्या जागांची संख्या वाढवून 815 करण्याची तरतूद या विधेयकांमध्ये आहे.

या विधेयकांवरील चर्चेत भाग घेताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, धोरण निर्मितीमध्ये महिलांना योग्य प्रतिनिधित्व देणं ही काळाची गरज असल्याचं सांगितलं. देशाच्या विकासात नारी शक्ती महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. याला राजकीय रंग देऊ नये असं आवाहन करत हे विधेयक लोकशाहीच्या हिताचं आहे, असं त्यांनी सांगितलं. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे कुठल्याही राज्याच्या बाबतीत भेदभाव होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले....

**आज बड़ी जिम्मेवारी के साथ इस सदन में कहना चाहता हूं कि चाहे दक्षिण हो, उत्तर हो, पूर्व हो, पश्चिम हो, छोटे राज्य हो, बड़े राज्य हो निर्णय प्रक्रिया किसी के साथ भी भेदभाव नहीं करेगी। यह निर्णय प्रक्रिया किसी के साथ अन्याय नहीं करेगी। भूतकाल में जो सरकारें रही और जिनके कालखंड में जो परिसीमन हुआ और जो अनुपात उस समय से चला आ रहा है, उस अनुपात में भी कोई बदलाव नहीं होगा।**

कॉंग्रेस नेत्या प्रियंका गांधी, गौरव गोगोई, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनीही या विधेयकांवरील चर्चेत भाग घेतला. पंचायत राज संस्था आणि नगरपालिकांमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूद सर्वप्रथम माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस सरकारने केली होती. या निर्णयामुळे तळागाळातील महिलांच्या

राजकीय सहभागाला मोठी चालना मिळाली, असं प्रियंका गांधी म्हणाल्या. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला भविष्यातील मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेशी जोडण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. लोकसभेची विद्यमान 543 सदस्य संख्या कायम ठेवून महिलांसाठी आरक्षण तात्काळ लागू का करता येत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राज्यसभेत काल विनोद तावडे, नितीन नबीन, अभिषेक मनुसिंघवी, यांच्यासह काही नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. विनोद तावडे यांनी मराठीत शपथ घेतली.

**राष्ट्रपती-वर्धा**

भारतातील विविध भाषांमधून संस्कृती, संवेदनशीलता आणि चेतनेचा एकच प्रवाह वाहत असतो, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल वर्धा इथं केलं. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचा सहावा दीक्षांत समारंभ राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. देशातल्या विविध राज्यांमधील विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत हे पाहून आपल्याला आनंद झाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आंतरभाषिक संवादाची ही परंपरा हिंदीसह सर्व भारतीय भाषांच्या प्रगतीला हातभार लावेल, असंही त्यांनी अधोरेखित केलं. त्या म्हणाल्या.....

**हमें सशक्त, आत्मनिर्भर और विकसित भारत का निर्माण करना है। ऐसे भारत का निर्माण भारतीय भाषाओं की आधारशिला पर ही संभव हो सकता है। इसलिए इस दिशा में हमें ध्यान देना है, जोर लगाना है। 'राष्ट्रीय शिक्षा नीति' सहित अनेक प्रयासों के बल पर हमारा देश सही दिशा में अग्रसर हो रहा है।**

वर्ध्यातील सेवाग्राम आश्रमाला राष्ट्रपतींनी काल भेट दिली. बा कुटी आणि बापु कुटीची त्यांनी यावेळी माहिती घेतली.

**निवडणूक-मुंबई**

राज्य विधान परिषदेच्या 9 जागांसाठी 12 मे रोजी मतदान होणार असल्याचं निवडणूक आयोगाने काल जाहीर केलं. या निवडणुकीसाठी23 ते 30 एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. 2 मे रोजी अर्जांची छाननी होईल, 4 मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि 12 मे रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत मतदान होईल. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, संजय केनेकर, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि रणजीतसिंह मोहिते हे सदस्य येत्या 13 मे रोजी निवृत्त होत आहेत.

**मुख्यमंत्री-पुणे दौरा**

सेवाभावनेने कार्य करणाऱ्या धर्मादाय संस्थांना शासनाचं कायम सहकार्य असेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात दिली. लता मंगेशकर मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने नांदोशी इथं उभारण्यात येणाऱ्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस' या रुग्णालय प्रकल्पाच्या कोनशिला समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, फाऊंडेशनचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**एक कार्य आम्ही देखील या ठिकाणी हातामध्ये घेतलं पाहिजे आणि उपमुख्यमंत्री महोदय आणि महापौर मॅडम या ठिकाणी येण्याचा जो रस्ता आहे तो आपल्याला थेट आणि मोठा रस्ता कसा करता येईल हा पहिला प्रयत्न आपण करूया. इथे जे पाण्याची थोडी कमतरता आहे ते पाणी या ठिकाणी आपल्याला कसं आणता येईल हा दुसरा प्रयत्न आपण करूया, आणि या निमित्ताने एक कदाचित इतक्या लोकांच्या या प्रयत्नामध्ये आपलाही खारीचा वाटा या निमित्ताने आपण देऊ शकू आणि आपल्या लता दीदींना आणि आशाताईंना या निमित्ताने**

**थोडीशी श्रद्धांजली आपण वाहू शकू, तर ही जबाबदारी निश्चितपणे आम्ही या ठिकाणी घेऊ हे आज या निमित्ताने सांगतो.**

लता मंगेशकर आणि आशा भोसले यांचे स्वर मानवी वेदना दूर करणारे आहेत. लता-आशा रुग्णालय प्रकल्पाची सुरूवात ही या दोन्ही महान गायिकांच्या कार्याला दिलेली श्रद्धांजली आहे. असं सरसंघचालक मोहन भागवत यावेळी म्हणाले.

**मुख्यमंत्री-चितळे**

पुणे जिल्ह्यातील रांजे इथं उभारण्यात आलेल्या चितळे बंधू व्हिजन पार्कचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. नव्या काळातील आव्हानांना सामोरं जाऊन ग्लोबल ब्रँड बनवण्याचा आत्मविश्वास चितळे बंधूनी दाखविला आहे; राज्यातील खाद्य उद्योगाला प्रगत ब्रँडच्या रुपात जागतिक पातळीवर नेण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**रुग्णवाहिका**

पालघर जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रासाठी सहा रुग्णवाहिकांचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल वर्षा निवासस्थानी करण्यात आलं. लिलाराम जांगिड चॅरिटेबल ट्रस्ट आणि आमदार प्रवीण दरेकर यांच्यामार्फत या रुग्णवाहिका देण्यात आल्या आहेत.

**बालविवाह-धाराशिव**

येत्या अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर कोणत्याही ठिकाणी बालविवाह आढळल्यास तात्काळ गुन्हा नोंदवावा, असे स्पष्ट निर्देश धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी नागरिकांना दिले आहेत. अक्षय तृतीया हा शुभ मुहूर्त मानला जात असल्यामुळे या दिवशी राज्यात मोठ्या प्रमाणावर सामूहिक तसंच वैयक्तिक विवाह सोहळे आयोजित केले जातात. मात्र, याच दिवशी बालविवाह होण्याची शक्यता असल्याचे लक्षात घेता, पोलीस विभाग, बाल संरक्षण समिती आणि जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात कमाल तापमानात वाढ झाली आहे. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचीही शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.